मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशी दुर्घटनेतील कुटुंबांना मोठा दिलासा

## मृतांच्या वारसांना प्रत्येकी 40 लाखांची मदत देणार; मुलांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च, एका नातेवाईकाला कायमस्वरूपी नोकरी, आरोग्य विमाही काढणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पातील दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नऊ कामगारांच्या कुटुंबीयांना कंपनीकडून प्रत्येकी ४० लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. याशिवाय पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून प्रत्येकी १० लाख, तर राज्य शासनाकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. मृत कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च, कुटुंबातील एका व्यक्तीला कायमस्वरूपी नोकरी तसेच कुटुंबीयांचा आरोग्य विमा काढण्याची जबाबदारी कंपनीने स्वीकारली आहे.



### मागण्यांपैकी तीन मागण्या मान्य

» मृत राहुल गायकवाड यांचे बंधू सतीश गायकवाड म्हणाले, "राहुलचे स्वतंत्र कुटुंब होते. आता त्याच्या कुटुंबाची सर्व जबाबदारी माझी आहे. महापालिकेत नोकरी, घर, एक कोटी रुपये आर्थिक मदत, आरोग्य विमा आणि नऊ कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणाचा खर्च, अशा मागण्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी नोकरी, आरोग्य विमा आणि शिक्षणाचा खर्च कंपनीने मान्य केला आहे. एक कोटी रुपयांची मागणी होती; मात्र ४० लाख रुपयांच्या मदतीवर सहमती झाली आहे. हा व्यवहार नव्हता. कुटुंबीयांच्या परिस्थितीचा विचार करून हा निर्णय सर्वांना मान्य आहे." दुर्घटनेतील नऊ मृतांपैकी पाच जण कंपनीच्या सेवेत, तीन जण कंत्राटी पद्धतीने, तर एक जण चालक म्हणून कार्यरत होता. कंपनीकडून आतापर्यंत प्रत्येकी २० लाख रुपये देण्यात आले असून, उर्वरित मदतीची प्रक्रिया सुरू आहे.

कंपनीचे एचआर प्रमुख सुनील नेवे आणि मोशी प्रकल्पाचे प्रमुख दादासाहेब अरडे यांनी मृतांच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. कंपनीकडून यापूर्वी प्रत्येकी दहा लाख रुपये देण्यात आले आहेत. आणखी दहा लाख रुपये सोमवारी (दि.१०) संध्याकाळपर्यंत देण्यात येणार असल्याचे नेवे यांनी सांगितले. विम्यासह कंपनीकडून प्रत्येकी ४० लाख रुपयांची मदत केली जाणार आहे.

"मोशी प्रकल्प आणखी २१ वर्षे सुरू राहणार आहे. त्यामुळे मृतांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला कायमस्वरूपी नोकरी देण्यात येईल. ऑगस्टपासून वेतन सुरू करण्याचा प्रयत्न आहे. मुलांना ते कितीही पुढे शिकले, तरी त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च कंपनी करणार आहे. आई-वडील, पत्नी आणि मुलांचा आरोग्य विमाही काढण्यात येईल," असे नेवे यांनी सांगितले.

महापालिकेच्या नियमानुसार कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी आणि घर देण्याबाबतही प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी महासभेची मान्यता घेऊन राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाणार आहे. काही कुटुंबांमध्ये लहान मुले असून, एका कुटुंबात नोकरी करण्यासाठी सक्षम व्यक्ती नसल्याने त्या कुटुंबाच्या पुनर्वसनाचा प्रश्नही महत्त्वाचा ठरणार आहे.

या दुर्घटनेत झालेली जीवितहानी कधीही भरून येणार नाही. मात्र, मृतांच्या कुटुंबीयांचे दुःख काही प्रमाणात कमी करण्यासाठी कंपनीकडून शक्य ती सर्व मदत करण्याचा प्रयत्न आहे. ही घटना कंपनीसाठीही अत्यंत धक्कादायक आहे, असे कंपनी प्रशासनाने स्पष्ट केले.

# पिंपरी चिंचवडमध्ये 16 वी हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धा

## 12 ते 23 ऑगस्टदरम्यान राष्ट्रीय स्तरावरील हॉकीपटूंचा रंगणार थरार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व हॉकी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने १६ वी हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेची स्पर्धा १२ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मेजर ध्यानचंद हॉकी पॉलिग्रास स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी येथे होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती क्रीडा विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील यांनी दिली आहे.




या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ तसेच राज्याचा उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. याशिवाय राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार मेधा कुलकर्णी, पार्थ पवार, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

तसेच आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, डॉ. निलम गोऱ्हे, अमित गोरखे, विक्रम काकडे, शंकर मांडेकर यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, ल प्रभाग अध्यक्ष रेखा देवकर, नगरसदस्य जितेंद्र ननावरे, मनिषा लांडे, वर्षा जगताप, योगेश बहल यांच्यासह महापालिकेचे सर्व प्रभाग अध्यक्ष, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर आणि विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

देशभरातील युवा महिला हॉकीपटूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी ही स्पर्धा पिंपरी चिंचवड शहराच्या क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेच्या आयोजनामुळे शहरातील क्रीडाप्रेमी तसेच युवा खेळाडूंना उच्च दर्जाच्या हॉकी सामन्यांचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

# मोशीत संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी सोहळा उत्साहात संपन्न

## इंदुरीकर महाराजांचे प्रबोधनात्मक कीर्तन, विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांना भाविकांनी मोठा प्रतिसाद दिला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महात्मा फुले युवा मंच व समस्त ग्रामस्थ मोशी यांच्या वतीने मोशी येथील श्री नागेश्वर महाराज चौक येथे संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी सोहळा मागील २५ वर्षांची परंपरा जपत या वर्षीही अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. दिवसभरात आयोजित विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांना भाविकांनी मोठा प्रतिसाद दिला.

सोहळ्याची सुरुवात अरणगाव ते मोशी पायी आणलेल्या संत ज्योतींच्या आगमनाने झाली. या प्रसंगी 'श्री छत्रपती वाद्य पथकाचे सादरीकरण झाले. त्यानंतर समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे प्रबोधनात्मक कीर्तन संपन्न झाले.







आपल्या खास शैलीत समाजप्रबोधन करताना इंदुरीकर महाराज म्हणाले, "आजच्या तरुण पिढीने आईवडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आयुष्य जगले पाहिजे. आईवडिलांनी मुलांच्या जीवनशैलीवर बारकाईने लक्ष ठेवले तरच त्यांची वाटचाल योग्य होईल. संतांचे विचार आणि वैज्ञानिक गोष्टींचे ज्ञान आत्मसात करून वाटचाल करा. काम, क्रोध, लोभ यांची होळी करून स्वकर्तृत्वावर मोठे व्हा." पुढे बोलताना त्यांनी, "समाज उच्चशिक्षित झालाय पण अनेकजणांचे आचरण अशिक्षितांपेक्षाही खराब आहे. त्यामुळे 'सिविक सेन्स अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची गरज आहे. शरीर हीच खरी संपत्ती असल्याने ते निरोगी ठेवून सर्वांनी व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे," असे आवाहन केले. कीर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

संध्याकाळी संत प्रतिमेची अत्यंत दिमाखदार मिरवणूक काढण्यात आली. यानंतर शैलेश लोखंडे प्रस्तुत 'स्वाभिमान महाराष्ट्राचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला, ज्याचा उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी महात्मा फुले युवा मंच व मोशीतील ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सांगता गावातील सर्व भजनी मंडळांच्या भजनाने झाली. कार्यक्रमास महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. मोशीतील प्रत्येक धार्मिक,सामाजिक कार्यक्रमातून ग्रामस्थांच्या एकजूटीचे दर्शन घडले.

# जाधववाडीत रस्त्यांची चाळण अन् गटारी तुंबल्या प्रशासनाच्या अनास्थेमुळे नागरिक त्रस्त

## महापालिकेचे अधिकारी या समस्येकडे  दुर्लक्ष करत असून नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

जाधववाडी परिसरातील वडाचा मळा ते बोलाई मळा या रस्त्यावर गेल्या तीन महिन्यांपासून भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे.  तुंबणारी गटारे, संपूर्ण रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे या समस्यांनी नागरिक त्रस्त आहेत. वारंवार तक्रारी करूनही महापालिकेचे अधिकारी या समस्येकडे दुर्लक्ष करत असून नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



जाधववाडीतील वडाचा मळा, बोलाई मळा, सावता माळी मंदिर ते हॉटेल निसर्ग परिसर आणि सिटी प्राईड रस्ता या संपूर्ण भागात ड्रेनेज लाईनची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी गटारी तुंबून मैला पाणी रस्त्यावर येत असल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनीही ठराविक ठिकाणी ड्रेनेजच्या पाईपलाईन बदलणे आवश्यक असल्याचे प्रशासनाला सांगितले आहे, तरीही यावर कोणतीही कारवाई झालेली नाही.

दुसरीकडे, रस्त्यांची चाळण झाल्याने वाहनचालकांना खड्ड्यातून मार्ग काढताना कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी तर पथदिव्यांच्या समस्येमुळे या धोकादायक रस्त्यावरून प्रवास करणे जीवावर बेतू शकते अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. स्थानिक नागरिकांनी आणि प्रतिनिधींनी महापालिकेच्या स्थापत्य व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे जाब विचारला असता, 'आमच्याकडे सध्या निधी उपलब्ध नाही आणि कामासाठी ठेकेदारही नाही' अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन अधिकारी आपली जबाबदारी झटकत आहेत. नागरिकांकडून नियमित कर (टॅक्स) वसूल केला जात असताना कामासाठी निधी नाही हे सांगणे हा प्रशासनाचा बेजबाबदारपणा असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे. येत्या सोमवारपर्यंत महापालिकेने या भागातील रस्ते दुरुस्ती आणि ड्रेनेज लाईनचे काम सुरू केले नाही, तर महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा रहिवाश्यांनी दिला आहे.

> "जाधववाडीतील वडाचा मळा ते बोलाई मळा रस्त्यावर ड्रेनेज तुंबणे, खड्डे आणि पथदिव्यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अधिकारी निधी नाही आणि ठेकेदार नाही अशी कारणे सांगत आहेत. आम्ही भरलेला कर मग जातो कुठे? महापालिका आयुक्तांनी या निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. येत्या सोमवारपर्यंत जर जाधववाडीतील कामांना सुरुवात झाली नाही, तर आम्ही नागरिकांकडून भीक मागून निधी गोळा करू आणि तो महापालिकेला देऊन 'भीक मागो' आंदोलन करू."
>
> **- विशाल विलास आहेर,युवानेते, सामाजिक कार्यकर्ते**

> "जाधववाडी परिसरातील प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेण्यात येत आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याचे निर्देश देत आहे. निधी व ठेकेदाराबाबत असलेल्या तांत्रिक बाबी लवकरात लवकर दुरुस्त करून ड्रेनेज लाईन व रस्ते दुरुस्तीचे काम प्राधान्याने पूर्ण केले जाईल."
>
> **- अजय सूर्यवंशी,सह शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ उत्साहात

## लोकशाही मूल्ये अन् नेतृत्वगुणांची रुजवणूक, मूल्यांची योग्य रुजवणूक व्हावी, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील गुरुवर्य अकॅडमी स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण समारंभ (इन्व्हेस्टिचर सेरेमनी) अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि अभिमानास्पद वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये बालपणापासूनच नेतृत्वगुण विकसित व्हावेत, त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी आणि लोकशाही मूल्यांची योग्य रुजवणूक व्हावी, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या सोहळ्यास शाळेच्या व्यवस्थापन समितीचे प्रतिष्ठित सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात संस्थापक-अध्यक्ष भूषण मावळे, सह-संस्थापक व सचिव अनिल बेलकेरी, सह-संस्थापक व खजिनदार प्रसाद शेट्टी, विश्वस्त कैलास मोरे, संस्थापक-मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मावळे यांच्यासह विश्वस्त ज्योती बेलकेरी, शुभा शेट्टी आणि रूपाली मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित विद्यार्थी परिषद सदस्यांना मानचिन्हे आणि पदपट्टा प्रदान करून त्यांच्याकडे अधिकृत जबाबदारी सोपवण्यात आली. हे मानचिन्ह केवळ सन्मानाचे प्रतीक नसून कर्तव्य, शिस्त आणि सेवाभावाचे प्रतीक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

विद्यार्थी परिषद निवडणुकीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्यात आला. या निवडणुकीमुळे उमेदवारी, प्रचार, मतदारांशी संवाद, निर्णयक्षमता, मतभिन्नतेचा आदर आणि पराभव स्वीकारून पुन्हा प्रयत्न करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली आहे. नेतृत्व म्हणजे अधिकाराचे प्रतीक नसून ती एक जबाबदारी आहे; त्यामुळे विद्यार्थी नेत्यांनी आपल्या वर्तनातून इतरांसमोर आदर्श निर्माण करावा, असा मोलाचा सल्ला या वेळी देण्यात आला. विद्यार्थी परिषद ही शाळा प्रशासन आणि विद्यार्थी यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करते. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, सहकार्य, समस्या निवारण आणि सामाजिक बांधिलकी हे गुण विकसित होण्यास मदत होणार आहे.

शाळेत केवळ पाठ्यपुस्तकीय ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला जातो. नेतृत्वाच्या या संधीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, सार्वजनिक वक्तृत्व, सांघिक कार्य आणि सेवाभाव यांसारख्या गुणांचा पाया भक्कम होतो. 'मी' ऐवजी 'आपण' या भावनेतून काम करत संपूर्ण संघाला सोबत घेऊन पुढे जाण्याचा विचार यावेळी मांडण्यात आला. कार्यक्रमातील शपथविधी सोहळा हा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. यामध्ये नवनिर्वाचित प्रतिनिधींनी शाळेची प्रतिष्ठा जपण्याची आणि निष्ठेने कर्तव्य बजावण्याची शपथ घेतली. शालेय स्तरावर मिळणारी ही नेतृत्वाची संधी भविष्यातील सक्षम, शिस्तप्रिय आणि संवेदनशील समाज घडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरेल, असा विश्वास व्यवस्थापनाने व्यक्त केला. व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने हा समारंभ प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.




















# रस्त्यांच्या 75 कोटींच्या निविदांवरून महापालिकेत आरोप-प्रत्यारोप

## ठरावीक ठेकेदारांना कामे देण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबावाचा आरोप; महापौरांकडून आरोप फेटाळले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून विविध विकासकामे करण्यासाठी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदले आहेत. या रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेने निविदा काढल्या आहेत. या निविदांची कामे ठरावीक ठेकेदारांना मिळावीत, यासाठी महापौर बंगल्यावर अधिकाऱ्यांना बोलावून दमदाटी करून शिवीगाळ केली जाते.

महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या (भाजपच्या) आमदारांना ही कामे मिळावीत, यासाठी ठेकेदाराकडून दम दिला जातो, असे आरोप काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी केले. २६ जुलै या दिवशीच्या महापौर बंगल्यातील सीसीटीव्ही फूटेजची तपासणी केल्यास अधिकाऱ्यांना कुणी दमदाटी केली, याचे सत्य सर्वांसमोर येईल, असेही शिंदे म्हणाले.

'शहरातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करण्यासाठी महापालिकेच्या पथ विभागाने काही दिवसांपूर्वी तीन निविदा काढल्या. या निविदा प्रत्येकी २५ कोटी रुपयांच्या होत्या. या निविदा महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भाजपच्या मर्जीतील ठेकेदारांनाच मिळाव्यात, यासाठी महापौर मंजूषा नागपुरे यांच्या घोले रस्त्यावरील बंगल्यात बैठक घेण्यात आली. यामध्ये महापालिकेच्या पथ विभागातील अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले होते.

या बैठकीत भाजपच्या महिला पदाधिकाऱ्याच्या पतीच्या उपस्थितीत महापालिका अधिकाऱ्यांना दमदाटी करत मर्जीतील व्यक्तींना रस्त्याचे काम देण्यासाठी दबाव टाकण्यात आला. शिवीगाळ करण्यात आली,' असे आरोप शिंदे यांनी केले. ठरावीक ठेकेदारांना काम मिळावे, यासाठी हा अट्टहास सुरु असून भाजपच्या दोन आमदारांचा यामध्ये सहभाग असल्याचा आरोप शिंदे यांनी केला.

नगरसेवक अरविंद शिंदे यांनी केलेले आरोप महापौर मंजुषा नागपुरे यांनी फेटाळून लावले. त्या म्हणाल्या, महापौर बंगल्यावर असा कोणताही प्रकार घडलेला नाही. अरविंद शिंदे असा आरोप का करत आहेत, याची माहिती मला नाही. उलट रस्त्यांच्या पुनर्डांबरीकरणाच्या ७५ कोटींच्या निविदांमध्ये अटी-शर्तींचे पालन केले नसल्याची लेखी तक्रार आली होती. त्याची दखल घेऊन, शहानिशा करून योग्य निर्णय घ्यावा, असे पत्र महापालिका आयुक्तांना दिले होते.



### निविदा रद्द; नव्याने प्रक्रिया

» रस्ते पुनर्डांबरीकरणाच्या ७५ कोटी रुपयांच्या निविदांबाबत प्राप्त तक्रारींची दखल घेत महापालिका प्रशासनाने विद्यमान निविदा रद्द करून नव्याने निविदा काढण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत माहिती दिली. निविदांचे विभाजन केल्यामुळे अधिक ठेकेदारांमध्ये स्पर्धा निर्माण होईल. त्यातून कामाचा दर्जा, कामाचा वेग आणि प्रशासनाचे नियंत्रण सुधारण्यास मदत होईल, असा प्रशासनाचा दावा आहे. नवीन निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### ७५ कोटींच्या निविदांवर आरोप

» पुणे शहरातील रस्त्यांच्या पुनर्डांबरीकरणासाठी महापालिकेच्या पथ विभागाने प्रत्येकी २५ कोटी रुपयांच्या तीन निविदा काढल्या होत्या. या निविदा ठरावीक ठेकेदारांना मिळाव्यात, यासाठी महापौर बंगल्यावर अधिकाऱ्यांना बोलावून दबाव टाकण्यात आल्याचा आरोप काँग्रेसचे नगरसेवक अरविंद शिंदे यांनी केला. भाजपच्या मर्जीतील ठेकेदारांना काम मिळावे, यासाठी अधिकाऱ्यांना दमदाटी आणि शिवीगाळ करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. २६ जुलैच्या महापौर बंगल्यातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यास सत्य समोर येईल, असे शिंदे यांनी म्हटले.

### महापौरांनी आरोप फेटाळले

» अरविंद शिंदे यांनी केलेले आरोप महापौर मंजुषा नागपुरे यांनी स्पष्टपणे फेटाळून लावले. महापौर बंगल्यावर अधिकाऱ्यांना दमदाटी किंवा शिवीगाळ करण्याचा कोणताही प्रकार घडलेला नाही, असे त्यांनी सांगितले. उलट, ७५ कोटी रुपयांच्या रस्ते पुनर्डांबरीकरण निविदांमध्ये अटी-शर्तींचे पालन झाले नसल्याची लेखी तक्रार प्राप्त झाली होती. त्याची दखल घेऊन चौकशी करून योग्य निर्णय घ्यावा, असे पत्र आयुक्तांना दिल्याचे नागपुरे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे निविदांबाबत पारदर्शकता राखण्याची भूमिका घेतल्याचे त्यांनी सांगितले.

# पाषाण-कोथरूड प्रवास आता 10 मिनिटांत; 'पाताळलोक' बोगदा प्रकल्पाला वेग

## तीन किलोमीटरच्या भुयारी मार्गासाठी पीएमसीकडून निविदा; 27 ऑगस्टला उघडणार टेंडर

**पुणे | प्रतिनिधी**

पाषाण ते कोथरूडदरम्यानचा सुमारे ४० मिनिटांचा प्रवास भविष्यात अवघ्या १० मिनिटांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. पाषाण-पंचवटी-कोथरूडला जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी पाताळलोक रस्ता बोगदा प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेला आता वेग येण्याची चिन्हे आहेत.

सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या या बोगद्याच्या बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्याकरिता महापालिकेने निविदा मागविल्या असून, या निविदा २७ ऑगस्ट २०२६ रोजी उघडण्यात येणार आहेत. त्यामुळे गेल्या काही काळापासून चर्चेत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

पाषाण, पंचवटी आणि कोथरूड या भागांना जोडणारा हा भुयारी मार्ग शहरातील वाहतूककोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. सध्या गर्दीच्या वेळेत पाषाणहून कोथरूडला जाण्यासाठी वाहनचालकांना ४० मिनिटे लागतात. प्रस्तावित बोगदा पूर्ण झाल्यानंतर हा प्रवास अवघ्या १० मिनिटांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पामुळे पाषाण-कोथरूडदरम्यानचा प्रवास अधिक जलद होण्यासोबतच परिसरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. वाढती लोकसंख्या, दिवसेंदिवस वाढणारी वाहनसंख्या आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूककोंडी लक्षात घेता पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.



### शहरातील पहिला भुयारी मार्ग

» प्रस्तावित बोगद्याची लांबी तीन किलोमीटर असेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास पुणे शहरातील पहिला शहरी रस्ता बोगदा ठरणार आहे. सध्या या प्रकल्पाचे अलाइनमेंट प्राथमिक स्वरूपात असून, अंतिम आराखडा तयार करताना त्यामध्ये काही बदल होण्याची शक्यता आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती झाल्यानंतर बोगद्याच्या प्रकल्पाशी संबंधित तांत्रिक अभ्यास, अंतिम आराखडा, बांधकामाची पद्धत, तसेच अन्य तांत्रिक बाबींना अधिक स्पष्टता मिळणार आहे. त्यामुळे २७ ऑगस्टला उघडण्यात येणाऱ्या निविदांकडे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले जात आहे.